International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# शाश्वत विकास लक्ष व भारतातील भूक निर्देशांक स्थिती : एक चिकित्सक विश्लेषण

**डॉ. अतुल सं. नौबदे[1], श्रीमती ज्योती अ. नौबदे[2]**

[1]आधिव्याखाता (औद्योगिक अर्थशास्त्र), ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परळ, मुंबई
[2]फ्रीलांसर, सी – 307, अराध्यम, पीसीएमसी, पुणे

**गोषवारा :**

जगात 2030 पर्यत शाश्वत विकास लक्ष्य साध्य करावयाचे असून त्या अनुषंगाने विविध धोरण व नियोजन करण्याचे कार्य सर्वत्र प्रगतीपथावर आहे. अशा स्थितीमध्ये भारतातील भूक बळींची स्थिती गंभीर असल्याचा खुलासा जागतिक भूक निर्देशांक अहवालात करण्यात आलेला आहे. भारत हा कृषीप्रधान देश असूनसुद्धा भारताचा समावेश जागतिक भूक निर्देशांकानुसार गंभीर स्थितीमध्ये असणा-या देशांमध्ये होतो. यावर सखोल विचार करणे आवश्यक असून जागतिक भूक निर्देशांकाची व त्यांच्या गणनेसाठी विचारात घेतलेल्या उपघटकांची मागील दोन दशकातील स्थिती अभ्यासणे आवश्यक आहे. भारतातील विविध राज्यांनी शाश्वत विकासाचे शून्य भूकबळी हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आलेला असून त्यावरुन असे दिसून येते की, अद्याप जवळपास 45 टक्के राज्यांची प्रगती ही देशाच्या सरासरी प्रगतीपेक्षा कमी आहे. अर्थात जागतिक भूक निर्देशांकाच्या गणनेतील बालकांचे पोषण व बालकांचे वजन आणि उंची यातील विसंगती व शाश्वत विकास लक्ष्ये साध्य करण्याच्या अनुषंगाने भारतातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी केलेली प्रगती विचारात घेता भारताचा समावेश गंभीर स्थिती असणा-या देशामध्ये होऊ शकतो.

**मुख्य शब्द -** शाश्वत विकास लक्ष्ये, जागतिक भूक निर्देशांक, कुपोषण, बालमृत्यू, बालकांचे वय व वजन यातील विसंगती, बालकांचे वजन आणि उंची यांतील विसंगती, शून्य गरीबी, शून्य भूकबळी

**प्रस्तावना :**

सध्या 'शाश्वत विकास' ही एक महत्त्वाची संकल्पना असून जागतिक स्तरावर याची चर्चा निरंतरपणे चालू आहे. शाश्वत विकास ही संकल्पना समजून घेण्याअगोदर नेमका विकासाचा अर्थ विचारात घेणे अवश्यक आहे. साधारणतः दुस-या महायुध्दापर्यत विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास या पूरतीच मर्यादीत होती. विविध अर्थशास्त्रज्ञांनी विकासाचा अर्थ विविध प्रकारे विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे; त्यातील काही अर्थशास्त्रज्ञ हे केवळ उत्पन्नाच्या संदर्भात, काही दरडोई उत्पन्नाच्या अनुषंगाने तर काही आर्थिक कल्याणाच्या अनुषंगाने मत-मतांतरे मांडतात. काहींच्या मते, दीर्घकाळात राष्ट्राच्या वास्तव उत्पन्नात वाढ होणे यालाच आर्थिक विकास म्हणतात. परंतु ही व्याख्या परिपूर्ण नसून यामध्ये इतर घटकांचा परिणाम लक्षात घेतलेला दिसून येत नाही.

तर दरडोई उत्पन्नासंदर्भात केलेल्या व्याख्येवरुन असे म्हणता येईल की, आर्थिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे, जिच्यात राष्ट्राचे दरडोई वास्तव उत्पन्न दीर्घकाळात वाढत असते. परंतु केवळ दरडोई उत्पन्नात वाढ झाली म्हणजेच लोकांच्या राहणीमानत वाढ होतेच असे नाही. त्यामुळे आर्थिक विकास झाला असे म्हणता येणार नाही. तर काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, आर्थिक विकास म्हणजे भौतिक कल्याणातील एक कायमस्वरुपाची सुधारणा असून तिचे प्रतिबिंब वस्तुंच्या व सेवांच्या वाढीत दिसून येते. परंतु यामध्येही दोष आहेत. राष्ट्राच्या वास्तव उत्पन्नात सतत वाढ होणे म्हणजे आर्थिक कल्याणात वाढ होणे असे नाही. यातून उत्पन्न विषमताही निर्माण होते. त्यामुळे आर्थिक कल्याणात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास झाला असे म्हणता येणार नाही. यावरून सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की, उत्पादन घटकांचा, योग्य तंत्राचा वापर केल्यामुळे दरडोई वास्तव उत्पन्नात किंवा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असेल व त्यामुळे लोकांच्या राहणीमानात प्रगती होत असेल तर त्याला आर्थिक विकास म्हणता येईल.

यावरुन असे म्हणता येईल की, आर्थिक विकास हा एकच घटक मानव विकासाचा पाया ठरु शकतो असे नाही. यातूनच संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) यांनी 1990 मध्ये प्रकाशित केलेल्या पहिल्या मानव विकास अहवालानुसार मानव विकास घडून येण्यासाठी आर्थिक बाबींव्यतिरिक्त शिक्षण, आरोग्य, रोजगाराची संधी अशा अन्य बाबी देखिल निश्चितपणे जबाबदार आहेत. विकासाच्या केंद्रस्थानी मानवच असावयास हवा हे जगासमोर प्रभावीपणे मांडण्याचे कार्य संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांनी त्यांच्या विविध मानव विकास अहवालातून मांडलेले आहे. मानव विकासाचे चार आधास्तंभ असून त्यामध्ये समानता, स्थिरता, उत्पादन आणि सक्षमीकरण इत्यादींचा समावेश होतो. परंतु या चार स्तंभातून घडवून येणारा मानव विकास शाश्वत असेल तरच त्याचा ख-या अर्थाने भविष्यातील मानवी पिढ्यांना ख-या अर्थाने मानव विकासाचा अर्थ सांगण्यात आपण सक्षम असू. यातूनच शाश्वत विकासाची ध्येय निश्चिती करुन मानव विकास साधण्याचा प्रयत्न जगभर चाललेला आहे. तेव्हा शाश्वत विकास ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

शाश्वत विकास या संकल्पनेचा उगम घटत चालेली नौसर्गिक संसाधने व त्यामुळे मंदावणा-या आर्थिक विकासाची भिती यामधून प्रामुख्याने  निर्माण झालेली आहे. जागतिक उत्पादन व्यवस्थ्येवर नियंत्रण असलेल्या मुठभर देशांनी घडून आणलेल्या मौल्यवान व मर्यादित संसाधनांच्या गैरवापराच्या परिणामस्वरुप ही संकल्पना टप्या-टप्प्याने विकसित होत गेल्याचे दिसून येत्ते. सर्व प्रकारचा आर्थिक विकास हा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे केवळ नैसर्गिक संसाधनाच्या वापरावर अवलंबून असतो. पण नैसर्गिक संसाधने हे नेहमीच मर्यादित असतात यातून प्रमुख्याने आर्थिक प्रश्न निर्माण होत असतात. तसेच्या त्यांच्या अतिरेकी वापरामुळे ते संपुष्टात येण्याचा धोका मानवासमोर कायमस्वरुपी असतो. सदर उत्पन्न प्रक्रियेदरम्यान उत्पादित होणा-या विविध प्रदुषित घटकांमुळे पर्यावरणाची हानी होऊन तसेच संसाधनाच्या अतिरेकी वापरामुळे ते संपुष्टात येऊन भविष्यातील विकासाचा वेग मंदावण्याचा धोका असतो. म्हणजेच संसाधनांचा अविवेकी वापर करणारा व पर्यावरणाची हानी करणारा विकास हा भविष्यासाठी अशास्वत आहे. त्यामुळे वर्तमानातील विकास हा नेहमीच भविष्यकालीन विकासाची शाश्वती आजच सुनिश्चित करणारा असावा तसेच तो विकास हा शाश्वत विकास ठरेल. थोडक्यात असे म्हणता येईल की,  शाश्वत विकास म्हणजेच चीरकालीन विकास होय. 1983 च्या जागतिक पर्यावरण व विकास आयोग्याच्या मते, “शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांची स्वत:च्या गरजा भागविण्याची क्षमता धोक्यात न आणता वर्तमानातील गरजा भागवू शकतो.” अर्थात मानवाच्या विकासाचा हक्क अशा रितीने साध्य करण्यात यावा की ज्यामध्ये सध्यांच्या व भविष्यकालीन पिढ्यांच्या विकासात्मक आणि पर्यावरणीय गरजा समन्यायी पध्दतीने भागविणे

अत्यंत आवश्यक आहे. शाश्वत विकासाचे प्रामुख्याने आर्थिक शाश्वतता, सामाजिक शाश्वतता, पर्यावरणीय शाश्वतता आणि संस्थात्मक शाश्वतता हे आधार आहे. यामध्ये सामाजिक शाश्वतता विचारात घेता जगातील शाश्वत विकास साध्य करण्यासाठीच्या अनेक उद्दिष्टांपैकी मानवी भूकबळींचे प्रमाण कमी करणे हे एक महत्त्वाचे उदिष्ट्य आहे. या दृष्टिकोनातून भारताचा विचार करता 2013 मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा पारीत करुन देशातील जनतेला अन्न पाप्तीचा अधिकार प्रदान केलेला आहे. यातून समाजातील प्रत्येक घटकांना अन्न-धान्य मिळणे व कोणीही अन्नावाचून राहू नये याची या सामाजिक, मानवतावादी जाणिवेचे धोरण निर्धारित केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता भारतातील भूकबळींचे प्रमाण अभ्यासणे आवश्यक आहे. सबब शाश्वत विकास साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून देशातील भूकबळी व त्यांच्याशी निगडित घटकांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

**उद्दिष्ये :**

या संशोधन अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट हे भारतातील भूकबळी कमी करण्याच्या दृष्टिने निर्धारीत केलेल्या विविध घटकांची राज्यनिहाय स्थिती व भारताच्या भूक निर्देशांकाच्या स्थितीचे विश्लेषण करणे हे आहे.

**अभ्यास पद्धती :**

सदरसंशोधनअभ्यासामध्येसंख्यात्मकवगुणात्मकपध्दतीचावापरकरण्यातआलेलाअसून तो केवळ दुय्यम सांख्यिकी माहितीवर आधारीत आहे. यातील सांख्यिकी माहिती ही नीती आयोग, भारत सरकार यांच्या एस.डी.जी. ईडीया ईडेक्स ॲण्ड डॅश्बोर्ड 2020-21 व कन्सर्न वर्ल्डवाइड आणि वेल्थुंगरहिल्फ या संस्थानी संयुक्तरित्या प्रकाशित केलेले जागतिक भूक निर्देशांक अहवाल-2022 यातूनघेण्यातआलेलीआहे. सदरविश्लेषणहेकेवळभारत व भारतातील विविध राज्य यापुरतेमर्यादितआहे.

**विश्लेषण :**


जागतिक भूक निर्देशांक (जीएचआय) हा 'कन्सर्न वर्ल्डवाइड' आणि 'वेल्थुंगर्हिल्फ' या संस्थांनी संयुक्तरित्या प्रसिध्द केला असून त्यानुसार खालील तक्ता क्र. 1 मध्ये सदर अहवालानुसार भारतातील 2000 ते 2022 पर्यंतची स्थिती नमूद करण्यात आलेली आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशात भूक ही एक गंभीर समस्या बनली असल्याचे प्रमुख्याने या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. 1 – जागतिक भूक निर्देशांकात भारताची स्थिती

| वर्ष | 2000 | 2007 | 2017 | 2022 |
|---|---|---|---|---|
| जी.एच.आय. निर्देशांक | 38.8 | 36.3 | 28.2 | 29.1 |

(संदर्भ -जागतिक भूक निर्देशांक अहवाल-2022)

आकृती क्र. 1- जागतिक भूक निर्देशांकात भारताची स्थिती



वरील तक्ता व आकृती क्र. 1 वरुन असे दिसून येते की, भारतातील भूक निर्देशांक हा मागील दोन दशकांमध्ये घटत गेलेला आहे असून तो 9.7 अंकानी घटलेला आहे. प्रथम दशकातील स्थिती विचारात घेता तो 38.8 वरुन 36.3 पर्यंत कमी झालेला आहे. अर्थात यामध्ये 2.5 अंकानी घट झालेली असून 2007 ते 2017 या कालावधीत 8.1 अंकानी घट झालेली आहे. तर 2017 ते 2022 मध्ये केवळ 0.9 अंकानी वाढ झालेली दिसून येते. अर्थात कोरोना महामारीच्या कालावधीत भूकमारीमध्ये अल्प प्रमाणात घट झालेली असली तरी एकूण भूक निर्देशांकात घट झालेली दिसून येते. 2022 च्या अहवालानुसार जगातील 121 देशांपैकी भारताचा 107 वा क्रमांक असून भूक निर्देशांकाच्या 29.1 अंकासह भारत भूकेची गंभीर स्थिती असलेल्या देशांच्या यादीमध्ये मोडतो. अर्थात भारत हा कृषीप्रधान देश असून आणि देशातील 80 टक्के लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या कृषीवर अवलंबून असूनदेखिल भारतातील भूकबळींची संख्या पूर्णपणे अद्याप संपुष्टात आली नाही. अर्थात भूक निर्देशांक कमी करण्यासाठी योजनाबद्ध कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे दिसून येते.


खालील तक्ता क्र. 2 मध्ये भारताच्या भूक निर्देशांकात समाविष्ट असलेल्या विविध उपघटकांची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. 2 – भारताच्या भूक निर्देशांकात त्याच्या निर्देशांकाची (उपघटक) स्थिती

| निर्देशांक / वर्ष | 2000 | 2007 | 2017 | 2022 |
|---|---|---|---|---|
| कुपोषण (टक्केवारीत) | 18.4 | 17.5 | 14.8 | 16.5 |
| बालमृत्यू (टक्केवारीत) | 9.2 | 6.8 | 4.6 | 3.3 |
| बालकांचे वय व वजन यातील विसंगती (चाइल्ड स्टंटिंग) (टक्केवारीत) | 54.2 | 47.8 | 38.7 | 35.3 |
| बालकांचे वजन आणि उंची यातील विसंगती (चाइल्ड वेस्टिंग) (टक्केवारीत) | 17.1 | 20.0 | 15.1 | 19.3 |

(संदर्भ -जागतिक भूक निर्देशांक अहवाल-2022)

आकृती क्र. 2 - जागतिक भूक निर्देशांकात भारताची स्थिती




वरील तक्ता व आकृती क्र. 2 वरुन असे दिसून येते की, भारतातील भूक निर्देशांक गणना करण्यासाठी विचारात घेतलेल्या कुपोषण, बालमृत्यू, बालकांचे वय व वजन यातील विसंगती, बालकांचे वजन व उंची यातील

विसंगती या उपघटकांची स्थिती दर्शविण्यात आलेली आहे. ज्या अन्नात सकसता नाही किंवा पुरेसे अन्न मिळत नसल्यामुळे होणा-या कुपोषणाचे प्रमाण भारतात 2000 आणि 2007 मध्ये अनुक्रमे 18.4 व 17.5 इतके होते. 2017 मध्ये बालकुपोषणाचे 14.8 असून ते 2007 च्यातुलनेत 2.7 अंकानी त्यात घट झाल्याचे दिसून येते. मागील 10 वर्षाची आकडेवारी पाहता भारतातील कुपोषणाच्यकुपोषणाची समस्या थोड्या प्रमाणात का होईना कमी होताना दिसत होती. मात्र 2022 मध्ये कुपोषणाचा स्तर 16.5 टक्के असून तो आधीच्या तुलनेत वाढलेला दिसून येत आहे. भारतातील बालमृत्यूचे प्रमाण 2000 आणि 2007 मध्ये अनूक्रमे 9.2 व 6.8 टक्के होते तर 2017 मध्ये 4.6 टक्के व 2022 मध्ये 3.3 टक्के इतके आहे. यावरुन असे दिसून येते की, भारतातील बालमृत्यू मध्ये होणारी सदर घट ज्या प्रमाणात बालमृत्यू कमी होणे अपेक्षित होते, ती अपेक्षा पूर्ण झालेली दिसून येत नाही. चाइल्ड स्टंटिंग म्हणजेच पाच वर्षांच्या आतील बालकांच्या वय आणि वजन यातील विसंगतीचे प्रमाण भारतात सर्वाधिक आहे. 2000 आणि 2007 मध्ये चाइल्ड स्टंटिंग चे प्रमाण अनुक्रमे 54.2 टक्के आणि 47.8 टक्के होते तर 2017 मध्ये 38.7 टक्के असून 2022 मध्ये 35.3 टक्के आहे. पाच वर्षांच्या आतील बालकांचा वजन आणि उंची यातील विसंगतीचे (चाइल्ड विस्टिंग) प्रमाण हे भारतातील कुपोषणाचे दुसरे प्रभावी कारण आहे. 2000 व 2007 मध्ये चाइल्ड विस्टिंगचे भारतातील प्रमाण अनुक्रमे 17.1 व 20.0 टक्के होते, तर 2017 मध्ये 15.1 टक्के होते. 2022 मध्ये चाइल्ड वेस्टिंग चे प्रमाण 4.2 टक्क्यांनी वाढून 19.3 टक्के इतके झाले आहे.

यावरुन सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, 2000 मध्ये केवळ बालमृत्यूचे प्रमाण इतर तीन उपघटकांच्या तुलेनेत कमी होते. तर सर्वाधिक प्रमाण हे बालकांचे वय व वजन या घटकांत आहे. सदर दोन दशकांचा विचार करता सर्वच उपघटकांमध्ये घट झालेली असून सर्वाधिक प्रमाण बालकांचे वय व वजन या उपघटकांचे आहे. तर त्या खालोखाल बालकांचे वजन व उंची यातील विसंगती या उपघटकात आहे. त्या खालोखाल कुपोषणाचे प्रमाण असून सर्वात कमी बालमृत्यूचे प्रमाण हा घटक आहे. यामध्ये भारतातील कुपोषण विचारात घेता असे दिसून येते की, घटत चाललेले कुपोषण 2022 मध्ये 1.7 अंकानी वाढलेले आहे. बालकांचे वजन आणि उंची यातील विसंगतीची स्थिती विचारात घेता 2022 मध्ये 4.2 एवढ्या प्रचंढ प्रमाणात वाढ झालेली आहे. तर उर्वरित दोन उपघटक 2022 मध्ये घट झाल्याचे दिसून येते. अर्थात 2017 ते 2022 या कालावधीतील कोरोना महामारीचा हा परिणाम असावा असे वाटते. परंतु एकूण 2022 मधील भूक निर्देशांकाचा विचार करता भारत हा भूकेची गंभीर स्थिती असलेल्या देशांच्या यादीमध्ये मोडतो. त्यास वरील दोन उपघटकांमध्ये झालेली वाढ ही एकप्रकारे कारणीभूत आहे.

निती आयोग, भारत सरकार यांनी शाश्वत विकास ध्येय प्राप्तीच्या अनुषंगाने देशातील विविध राज्यांनी केलेल्या कामगिरीची स्थिती स्पष्ट केलेली असून ती खालील तक्ता क्र. 3 मध्ये दर्शविलेली आहे. वरील यामध्ये राज्याची प्रगती ही 100 पैकी मोजण्यात आलेली असून शाश्वत विकास लक्ष 1 निर्देशांकाची कामगिरी व शाश्वत विकास लक्ष 2 निर्देशांकाची कामगीरी विचारात घेण्यात आलेली आहे. यामध्ये एस.डी.जी. 1 हा शाश्वत विकासाच्या शून्य गरीबी या उद्देशाच्या अनुषंगाने निगडित असून त्यांच्या उपघटकांनी अथवा निर्देशांकानी केलेली कामगिरी पुढील उपघटक/निर्देशांकांच्या माध्यमातून विचारात घेण्यात आलेले आहेत. 1) राष्ट्रीय दारिद्यरेषेखालील जीवन जगणा-या लोकांचे प्रमाण, 2) बहुआयामी दारिद्य निर्देशांकानुसार लोकांचे प्रमाण, 3) कुटुंबातील आरोग्य योजना, आरोग्य सुरक्षा विमा असलेल्या लोकांचे प्रमाण, 4) मनरेगा अंतर्गत मागणी केलेच्या प्रमाणात प्रत्यक्ष रोजगार मिळालेल्या लोकांचे प्रमाण, 5) प्रधानमंत्री मातृ योजनांतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ योजनेच्या लाभार्थींचे प्रमाण आणि 6) कच्च्या घरामध्ये वास्तव्य करणा-या कुटुंबाचे प्रमाण इत्यादी घटक विचारात घेण्यात आलेले आहेत.

तसेच यामध्ये एस.डी.जी. 2 हा शाश्वत विकासाच्या भूकबळीचे समूळ उच्चाटन (भूकबळी नसणे) या उद्देशाच्या अनुषंगाने निगडित असून त्यांच्या उपघटकांनी अथवा निर्देशांकांनी केलेली कामगिरी पुढील उपघटक/निर्देशांकांच्या माध्यमातून विचारात घेण्यात आलेले आहेत. यामध्ये 1) राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत लाभार्थींचे प्रमाण, 2) कुपोषित बालकांचे प्रमाण, बालकांचे वय व वजन यांच्यातील विसंगतीचे प्रमाण, 3) वयवर्ष 15-49 यातील अनेमियाक गर्भवती महिलांचे प्रमाण, 4) वयवर्ष 10-19 यातील किशोरवयीन अनेमियाक बालकांचे प्रमाण, 5) तांदूळ आणि गव्हाचे वार्षिक उत्पादन प्रती युनिट क्षेत्रात (किलोग्रॅम/हेक्टर), आणि 6) जोडलेले एकूण मूल्य (प्रती कामगार कृषी मालाची स्थिर किंमत -कामगार लाखात) इत्यादी घटक विचारात घेण्यात आलेले आहेत.


तक्ता क्र. 3 – शाश्वत विकास ध्येय प्राप्तीतील भारताची राज्यनिहाय कामगीरी

| अ.क्र. | राज्ये | शाश्वत विकास लक्ष 1 निर्देशांकाची कामगीरी (शून्य गरीबी उद्दिष्टये) | शाश्वत विकास लक्ष 2 निर्देशांकाची कामगीरी (एकही भूकबळी नसणे) |
|---|---|---|---|
| 1 | आंध्र प्रदेश | 81 | 52 |
| 2 | अरुणाचल प्रदेश | 54 | 66 |
| 3 | आसाम | 51 | 41 |
| 4 | बिहार | 32 | 31 |
| 5 | छत्तीसगड | 49 | 37 |
| 6 | गोवा | 83 | 78 |
| 7 | गुजरात | 66 | 46 |
| 8 | हरियाणा | 69 | 58 |
| 9 | हिमाचल प्रदेश | 80 | 52 |
| 10 | झारखंड | 36 | 19 |
| 11 | कर्नाटक | 68 | 53 |
| 12 | केरळ | 83 | 80 |
| 13 | मध्य प्रदेश | 44 | 43 |
| 14 | महाराष्ट्र | 66 | 44 |
| 15 | मणिपूर | 60 | 64 |
| 16 | मेघालय | 77 | 37 |
| 17 | मिझोराम | 80 | 72 |
| 18 | नागालॅंड | 73 | 64 |
| 19 | ओडीसा | 41 | 42 |
| 20 | पंजाब | 69 | 73 |
| 21 | राजस्थान | 63 | 53 |
| 22 | सिक्किम | 80 | 69 |
| 23 | तामिळनाडू | 86 | 66 |
| 24 | तेलंगणा | 68 | 50 |

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | त्रिपूरा | 82 | 52 |
| 26 | उत्तर प्रदेश | 44 | 41 |
| 27 | उत्तराखंड | 74 | 61 |
| 28 | पश्चिम बंगाल | 59 | 46 |
| 29 | अंदमान आणि निकोबार | 71 | 45 |
| 30 | चंदीगड | 75 | 97 |
| 31 | दादरा नगर हवेली | 65 | 27 |
| 32 | दमन आणि दिव | 65 | 27 |
| 33 | दिल्ली | 81 | 63 |
| 34 | जम्मू आणि कश्मीर | 69 | 71 |
| 35 | लडाख | 79 | 71 |
| 36 | लक्षद्विप | 61 | 74 |
| 37 | पांडेचरी | 75 | 59 |
| | **भारत देश** | **60** | **47** |

(एस.डी.जी. ईडीया ईडेक्स अॅण्ड डॅश्बोर्ड 2020, नीती आयोग, भारत सरकार)

आकृती क्र. 3 – शाश्वत विकास ध्येय प्राप्तीतील भारताची राज्यनिहाय कामगीरी


भारत देश
पांडेचरी
लक्षद्विप
लडाख
जम्मू आणि कश्मीर
दिल्ली
दमन आणि दिव
दादरा नगर हवेली
चंदीगड
अंदमान आणि निकोबार
पश्चिम बंगाल
उत्तराखंड
उत्तर प्रदेश
त्रिपूरा
तेलंगणा
तामिळनाडू
सिक्किम
राजस्थान
पंजाब
ओडीसा
नागालॅंड
मिझोराम
मेघालय
मणिपूर
महाराष्ट्र
मध्य प्रदेश
केरळ
कर्नाटक
झारखंड
हिमाचल प्रदेश
हरियाणा
गुजरात
गोवा
छत्तीसगड
बिहार
आसाम
अरुणाचल प्रदेश
आंध्र प्रदेश
0
20
40
60
80
100
शाश्वत विकासाच्या (एकही)भूकबळी नसणे या उद्देशाच्या अनुषंगाने केलेली कामगिरी निर्देशांक
शाश्वत विकासाच्या शून्य गरीबी या उद्देशाच्या अनुषंगाने केलेली कामगिरी निर्देशांक

वरील तक्ता व आकृती क्र. 3 वरुन असे दिसून येते की, शून्य गरीबीची उद्दिष्टये साध्य करण्यासंबंधीत केलेल्या प्रगतीच्या अनुषंगाने भारतातील राज्याचा विचार करता 80 व त्यापेक्षा अधिक अंक प्राप्त केलेल्या राज्यांमध्ये तामिळनाडू, केरळ, गोवा, त्रिपूरा, दिल्ली, आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश, सिक्किम व मिझोरम या 9 राज्यांचा क्रमाक लागतो. तर भारताच्या सरासरीपेक्षा कमी कामगिरी केलेल्यांमध्ये एकूण 10 राज्याचा समावेश होत असून त्यामध्ये अनुक्रमे बिहार, झारखंड, ओरिसा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, आसाम, अरुणाचल प्रदेश व पश्चिम बंगाल हे आहेत;तर 80 पेक्षा अधिक अंक प्राप्त केले राज्य वगळता उर्वरीत 19 राज्यांची/केंद्रशासित प्रदेशांची कामगिरी ही 60 ते 80 अंकामध्ये आहे. यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगाणा, राजस्थान अशा मोठ्या राज्यांचा क्रमांक लागतो. अर्थात एस.डी.जी. 1 शाश्वत विकास लक्ष संबंधित 1) राष्ट्रीय दारिद्यरेषेखालील जीवन जगणा-या लोकांचे प्रमाण, 2) बहुआयामी दारिद्य निर्देशांकानुसार लोकांचे प्रमाण, 3) कुटुंबातील आरोग्य योजना,आरोग्य सुरक्षा विमा असलेल्या लोकांचे प्रमाण, 4) मनरेगा अंतर्गत मागणी केलेच्या प्रमाणात प्रत्यक्ष रोजगार मिळालेल्या लोकांचे प्रमाण, 5) प्रधानमंत्री मातृ योजनांतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ योजनेच्या लाभार्थींचे प्रमाण आणि 6) कच्च्या घरामध्ये वास्तव्य करणा-या कुटुंबाचे प्रमाण इत्यादी उपघटकांच्या अनुषंगाने सकारात्मक कार्य करण्यास 10 राज्यांना मोठ्या प्रमाणात वाव असून 28 राज्यांना/केंद्रशासित प्रदेशांना काम करण्यास वाव आहे. तर शून्य भूकबळी हे उद्दिष्टये साध्य करण्यासंबंधीत केलेल्या प्रगतीच्या अनुषंगाने भारतातील राज्याचा विचार करता 80 व त्यापेक्षा अंक प्राप्त केलेल्या राज्यामध्ये केवळ केरळ आणि चंदिगड या दोनच राज्याचा समावेश होत असून जवळपास 14 राज्ये हे देशाच्या सरासरीपेक्षा खाली आहेत. त्यामध्ये झारखंड, दादरा नगर हवेली, दमन व दिव, बिहार, छत्तीसगड, मेघालय, आसाम, उत्तर प्रदेश, ओडिसा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, अंदमान निकोबार, गुजरात, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांचा व केद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो. विशेषतः या यादीमध्ये महाराष्ट्र व गुजरात या पुरोगामी व प्रगत राज्याचा समावेश होत असून त्यांची प्रगतीही अनुक्रमे 44 व 46 अंक इतकी आहे. तर 80 पेक्षा अधिक अंक प्राप्त केलेली राज्य वगळता उर्वरीत 21 राज्य व केंद्रशासित प्रदेशांची प्रगती ही देशांच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. अर्थात एस.डी.जी. 2 शाश्वत विकास लक्ष्य संबंधीत 1) राष्टीय अन्न सुरक्षा कायदांतर्गत लाभार्थीचे प्रमाण, 2) कुपोषित बालकांचे प्रमाण, बालकांचे वय व वजन यांच्यातील विसंगतीचे प्रमाण, 3) वयवर्ष 15-49 यातील अनेमियाक गर्भवती महिलांचे प्रमाण, 4) वयवर्ष 10-19 यातील किशोरवयीन अनेमियाक बालकांचे प्रमाण, 5) तांदूळ आणि गव्हू यांचे वार्षिक उत्पादन प्रती युनिट क्षेत्रात (किलोग्रॅम/हेक्टर), आणि 6) जोडलेले एकूण मूल्य (प्रति कामगार कृषी मालाची स्थिर किंमत -कामगार लाखात) इत्यादी उपघटकांच्या अनुषंगाने सकारात्मक कार्य करण्यास 14 राज्यांना मोठ्या प्रमाणात वाव असून 23 राज्यांना/केंद्रशासित प्रदेशांना काम करण्यास वाव आहे.

एकंदरीत देशात शाश्वत विकासाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी राज्याने/केंद्रशासित प्रदेशांनी केलेल्या प्रगतीवरुन असे दिसून येते की, जवळपास 45 टक्के राज्यांची प्रगती ही देशाच्या सरासरी प्रगतीपेक्षा कमी आहे. म्हणजेच भारतातील विविध राज्ये/ केंद्रशासित प्रदेश यांनी शाश्वत विकासाच्या शून्य गरीबीच्या व शून्य भूकबळी या उद्दिष्टांच्या अनुषंगाने केलेली प्रगती व भूक निर्देशांक गणनेतील कुपोषण व बालकांचे वजन आणि उंची यातील विसंगती (चाइल्ड वेस्टिंग) यांची वाढलेली आकडेवारी विचारात घेता देशांचा भूक निर्देशांक अद्याप 29.1 असून भूकेची गंभीर स्थिती असलेल्या देशांच्या यादीमध्ये समावेश होतो. या सर्व बाबींवर विचार करुन भारतासारख्या कृषीप्रधान देशात एकही भूकबळी जणार नाही या दृष्टीकोनातून धोरणे तयार करुन त्यांची प्रभावी अमंलबजावणी करणे आवश्यक असून ही एक लोकचळवळ म्हणून प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. सदर भूक निर्देशांकात घट होणे हे भारतासारख्या देशांसमोरील एक आव्हान असून ते देशातील धोरणकर्ते, नियोजनकर्ते, राज्यकर्ते, प्रशासक यांच्या एकत्रित व सर्वसमावेशक प्रयत्नांतून ते समूळ उच्चाटण करणे शक्य आहे.

**सांराश :**

जागतिक भूक निर्देशांकावरुन भारत देशाचा समावेश हा गंभीर स्थिती असणा-या देशामध्ये होतो. बालकांचे पोषण व बालकांचे वजन आणि उंची यातील विसंगती या बाबी चिंतनीय आहेत. तसेच शाश्वत विकास लक्ष्य साध्य करण्याच्या अनुषंगाने भारतातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी केलेली प्रगती देखिल एक चिंतेची बाब असून देशांच्या सरासरीपेक्षा कमी प्रगती साध्य केलेल्या राज्यामध्ये महाराष्ट्र व गुजरात या पुरोगामी व प्रगत राज्यांचा समावेश होतो. यावर विचार करुन जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :**

1. डॉ. अतुल नौबदे (2021), महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा, यशोदिप पब्लिकेशन, प्रथमावृत्ती, पुणे
2. डॉ. जे. एफ. पाटील (2004), वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती, कोल्हापूर.
3. रंजन कोलंबे (2022), भारतीय अर्थव्यवस्थ्या, भगीरथ प्रकाशन, चौदावी आवृत्ती, पुणे
4. नीती आयोग (2021), एस.डी.जी. ईडीया ईडेक्स ॲण्ड डॅश्बोर्ड 2020, नीती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली.
5. Wiesmann, D. 2022. A Global Hunger Index: Measurement Concept, Ranking of Countries, and Trends. Food Consumption and Nutrition Division Discussion Paper 212. Washington, DC: International Food Policy Research Institute.